# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३८ वा ❑ मंगळवार दि.११ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### अमेरिकेत पुन्हा एकदा हिंदू मंदिराची विटंबना

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

मानवाधिकार, वंशभेद आणि लोकशाहीचा पुरस्कर्ता असल्याचा ढींढोरा पिटणाऱ्या अमेरिकेत हिंदूच्या मंदिरांना लक्ष केले जात आहे,जी अतिशय चिंताजनक बाब आहे.राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडून प्रचारात ट्रम्प यांनी बांगलादेश मध्ये हिंदूंवर व हिंदू मंदिरावरील होत असलेल्या तोडफोडीवर गंभीर चिंता व्यक्त केली होती.त्याच अमेरिकेत आता हिंदू मंदिराना लक्ष केले जात आहे.

अमेरिकेत गेल्या काही कालावधीपासून भारत आणि हिंदूंना विरोध केला जात आहे. अनेकदा भारतीयांना तेथे वंशवादाचा सामना करावा लागतो. दरम्यान, अमेरिकेत एका हिंदू मंदिरावर हल्ला करण्यात आला आहे. अलीकडच्या काळातील ही दुसरी घटना आहे. या मंदिरात भारताविरोधी संदेशही लिहण्यात आला आहे. बांग्लादेशात हिंदू मंदिरांवर होणाऱ्या हल्ल्यानंतर आता अमेरिकेतही हिंदू मंदिरावर हल्ल्याच्या घटना वाढ झाली आहे.

अमेरिकेच्या कॅलिफोर्निया शहरातील बाप्समध्ये असणाऱ्या स्वामीनारायण मंदिरात रविवारी हल्ला करण्यात आला. हल्ल्यात मंदिरांच्या भितींवर भारत आणि पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात काही लिहिले गेले आहे. एवढेच करुन हल्लेखोर थांबले नाहीत तर मंदिराचा परिसर अपवित्र करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून करण्यात आला. अमेरिकेत वाढत्या भारत विरोधी घटनांमध्ये मंदिरांवरील हल्ल्याची ही दुसरी घटना आहे.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की अमेरिकेत हिंदू मंदिराला लक्ष्य करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी सप्टेंबर २०२३ मध्येही कॅलिफोर्नियातील सॅक्रामेंटो आणि न्यू यॉर्कमधील बीएपीएस मंदिरात अशाच घटना घडल्या आहेत. या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार असलेल्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी भारतीय समुदायाने प्रशासनाकडे केली आहे. या घटनेनंतर हिंदू संघटनांमध्ये संताप आहे आणि ते मंदिरांची सुरक्षा वाढवण्याची मागणी करत आहेत.

भारताने यावर कडक भूमिका घेतली आहे आणि या घृणास्पद कृत्याचा तीव्र निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, भारत अशा घटनांना गांभीर्याने घेतो आणि स्थानिक प्रशासनाकडून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करतो. अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून प्रार्थनास्थळांची सुरक्षा सुनिश्चित केली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

या घटनेबाबत चिनो हिल्स पोलिस विभागाकडून अद्याप कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही, परंतु स्थानिक हिंदू समुदाय या प्रकरणाबाबत सक्रिय आहे. कोएलिशन ऑफ हिंदूज ऑफ नॉर्थ अमेरिकाने देखील या घटनेचा निषेध केला आहे आणि याला एक खोल कट रचल्याचे म्हटले आहे, आणि अलिकडेच प्रस्तावित ''खलिस्तान जनमत'' शी त्याचा संबंध जोडला आहे.

याआधी २२ डिसेंबर२०२४ रोजी रोजी खलिस्तानवाद्यांनी अमेरिकेतील एका हिंदू मंदिराला लक्ष्य केले होते. त्यानंतर खलिस्तानींनी कॅलिफोर्नियातील नेवार्कमध्ये ही घटना घडवून आणली. अमेरिकेच्या हिंदू–अमेरिकन फाऊंडेशनने या घटनेचे फोटो शेअर करताना सोशल मीडियावर लिहिले होते की, खलिस्तानवाद्यांनी नेवार्क, कॅलिफोर्निया येथील स्वामीनारायण मंदिर वसना संस्थेला लक्ष्य केले.

पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे की, ''लॉस एंजेलिसमध्ये तथाकथित खलिस्तान जनमतचा दिवस जवळ येत असताना हे घडले यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.'' संघटनेने गेल्या काही वर्षांत तोडफोड किंवा अपवित्र झालेल्या १० मंदिरांची नावे सार्वजनिक केली. सप्टेंबरमध्ये, कॅलिफोर्नियातील सॅक्रामेंटो येथील हिंदू मंदिराची भिंतीवर ''हिंदूंनो परत जा !'' अशा घोषणा लिहिण्यात आल्या आणि त्याची विटंबना करण्यात आली. सॅक्रामेंटो घटनेच्या सुमारे १० दिवस आधी, न्यू यॉर्कमधील मेलव्हिल येथील आणखी एका श्री स्वामीनारायण मंदिराची विटंबना करण्यात आली आणि त्यावर द्वेषपूर्ण संदेश लिहिले गेले. न्यू यॉर्कमधील भारतीय वाणिज्य दूतावासाने या घटनेचा तीव्र निषेध केला.

खलिस्तानी लोकांकडून होणारे अत्याचार वाढत आहेत. ते भारतात काहीही करू शकत नाहीत, म्हणूनच ते परदेशात भारतीय आणि सनातन धर्माचे प्रतीक असलेल्या मंदिरांवर हल्ला करत आहेत. त्यांना वाटते की असे करून ते भारताला दडपून टाकू शकतील, परंतु त्यांचे स्वप्न फक्त स्वप्नच राहील. ताजी घटना अमेरिकेतील कॅलिफोर्नियामधील चिनो हिल्सची आहे, जिथे बीएपीएस स्वामी नारायण मंदिराची तोडफोड करण्यात आली. शहरात होणाऱ्या कथित खलिस्तानी जनमतच्या काही दिवस आधी हे सर्व घडले आहे.

या घटनेमुळे खलिस्तानी लोकांचा हिंदूंबद्दलचा द्वेष उघडकीस आला आहे. तथापि, मंदिरावरील हल्ल्यात खलिस्तानी घटकांचा सहभाग होता असा स्पष्ट दावा करता येत नव्हता. पण एक प्रश्न निर्माण झाला आहे हा फक्त योगायोग आहे का, की त्यामागे काही खोल कट आहे ?

# महाराष्ट्रातील दोन साहित्यिकांचा प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मान

## डॉ. सुधीर रसाळ यांचा मराठीसाठी, डॉ. दिलीप झवेरी यांचा गुजराती साहित्यकृतीसाठी गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली** – मराठीतील ज्येष्ठ समीक्षक आणि लेखक डॉ. सुधीर रसाळ यांना त्यांच्या समीक्षात्मक ग्रंथ 'विंदांचे गद्यरूप' यासाठी तर गुजराती भाषेसाठी दिलीप झवेरी यांना त्यांच्या 'भगवाननी वातो' या कवितासंग्रहासाठी प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले.

येथील कमानी ऑडिटोरियममध्ये ' साहित्य अकादमी पुरस्कार २०२४ अर्पण' सोहळ्याचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रख्यात नाटककार आणि लेखक महेश दत्तानी प्रमुख पाहुणे म्हणून, तर साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, उपाध्यक्ष कुसुम शर्मा, सचिव के. श्रीनिवासराव व्यासपीठावर तसेच विविध भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मान्यवरांसोबत उपस्थित होते. पुरस्काराच्या स्वरूपात ताम्रपत्र, शाल आणि रुपये एक लाख रोख रक्कम प्रदान केली जाते. झालेल्या पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमात २३ प्रादेशिक भाषांमधील नामांकित साहित्यिकांच्या साहित्यकृतींना गौरवण्यात आले.

**''विंदांचे गद्यरुप'' या पुस्तकाविषयी**

मराठी साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या ''विंदाचे गद्यरुप'' या समीक्षात्मक पुस्तकात प्रख्यात मराठी कवी आणि समीक्षक विंदा करंदीकर यांच्या समीक्षात्मक लेखनावर सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

**ज्येष्ठ समीक्षक आणि लेखक डॉ.सुधीर रसाळ यांच्याविषयी**





डॉ.सुधीर रसाळ हे मराठीतील मान्यवर समीक्षक आणि लेखक आहेत. त्यांनी १९५६ पासून मराठी वाङ्मयाची समीक्षा करत उल्लेखनीय योगदान दिले आहे. दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व करणारे रसाळ हे औरंगाबाद विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे १९९० ते १९९३ या काळात प्रमुख होते. साहित्य लेखन, समीक्षा आणि संपादन या क्षेत्रांत त्यांचा हातखंडा आहे.

कवी, लेखक दिलीप झवेरी लिखित 'भगवाननी वातो' कवितासंग्रहाविषयी

गुजराती भाषेचे ज्येष्ठ कवी लेखक आणि समीक्षक दिलीप झवेरी यांचा जन्म मुंबईतील असून ते ठाणे येथे स्थायिक झाले आहेत. 'भगवाननी वातो हा गुजराती भाषेतील १६ पृथक्क गद्य कवितासंग्रह संग्रह असून एकच लांब कविता आहे.

या कवितासंग्रहामध्ये ईश्वरा बद्दल जटिल कोलाज मांडलेले असल्याने हा गंभीर केंद्रीय विषय आहे. हा कवितासंग्रह नाजूकपणे रोजच्या बोली भाषेत मांडलेला आहे. या कविता संग्रहामध्ये संपूर्ण ब्रह्मांडाला एकत्रित करण्याचा प्रयत्न आहे यामध्ये राजकीय व्यवस्था, विज्ञान, इतिहास भूतकाळ आणि वर्तमान का यांचे एकत्रित मिलाफ करून कविता गुंफल्या आहेत.

कोकणी भाषेसाठी लेखक नाटककार समालोचक आणि अनुवादक मुकेश थळी यांना त्यांच्या 'रंगतरंग ' निबंध संग्रहासाठी आज साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रंगतरंग या निबंध संग्रहात एकूण २४ वेगवेगळ्या विषयांवर निबंध लिहिलेले आहेत. या निबंधाची भाषा अत्यंत काव्यात्मक सुंदर तथा सहज स्पष्ट आणि आकर्षक अशी आहे. यामध्ये म्हणी, वाक्यप्रचार यांचा उपयोग करण्यात आला असून जी वाचकांना चकित करते. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त सर्वच सन्मानित साहित्यिक उद्या साहित्य अकादमी परिसरातील नर्मदा या सभागृहात सकाळी दहा वाजता त्यांच्या पुरस्कार प्राप्त साहित्य विषयी संवाद साधतील.


# भारत गदगे यांना जीवन गौरव पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**



पंढरपूरचे सुप्रसिद्ध चित्रकार लोकमान्य विद्यालयाचे मा.पर्यवेक्षक भारत गदगे सर यांना सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डॉ. किर्लोस्कर सभागृहात हि.ने. वाचनालय येथे हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. त्यांना प्राचार्य सुधीर देवरकोंडा, गोपाळराव डांगे, भंवर राठोड, डिझाइनचे व्यवस्थापख धर्मेश टंक, मुख्या.गोपीनाथ नवले, सतीश सुभेदार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार रविवार दि.९ मार्च रोजी प्रदान करण्यात आला. भारत गदगे सर हे पंढरपूरचे उत्तम चित्रकार असून त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन नामांकित कला दालनांमध्ये अनेक वेळा भरविले गेले आहे. श्री.विठ्ठल रुक्मिणीचे सुंदर अशा प्लँस्टरच्या मूर्ती अनेक ठिकाणी पहायला मिळतात. राष्ट्रपती व राजभवनात ही त्यांच्या चित्रांना स्थान मिळाले आहे. शास्त्रीय संगीत कार्यक्रम चालू असताना त्यांनी अनेक गायक वादकांची तिथेच चित्रे काढून त्यांना भेट दिली आहेत. चित्रकार म्हणून ते तर प्रसिद्ध आहेतच पण एक चांगले मित्र, शिक्षक म्हणून ते आपल्या मित्र कंपनीमध्ये प्रसिद्ध आहेत. अशा योग्य शिक्षकाचा, चित्रकाराचा सन्मान झाल्यामुळे पुरस्कार देणाऱ्या संस्थेचाच नावलौकिक वाढलेला आहे. असे वाटते.सरांना या जीवन गौरव पुरस्कार मिळाल्या बद्दल अभिनंदन.

## लक्षवेधी छायाचित्र....




# रक्तात भीम माझ्या हृदयामधे शिवाजी याहून श्रेष्ठ कुठली मी खानदान सांगू?

## पाचव्या जनसंवाद संमेलनात गझलसंध्येने आणली रंगत; शिवजयंतीनिमित्त गझलकारांनी केला शिवविचारांचा जागर




**ज्योतिर्मय साहित्य**

**नांदेड** – शिवजन्मोत्सव सोहळा समिती व सप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ५ वे जनसंवाद ग्रामीण मराठी साहित्य संमेलन नुकतेच भोकर तालुक्यातील मातुळ येथे प्रो.डॉ.गजानन देवकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या संमेलनाच्या गझलसंध्या या सत्रात विविध ठिकाणांहून आलेल्या गझलकारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिव विचारांचा जागर घडवून आणला. यावेळी स्वागताध्यक्ष सतिश पाटील मातुळकर, निमंत्रक बालाजी सूर्यतळे, सरपंच प्रतिनिधी प्रकाश कदम, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, उपाध्यक्ष पांडुरंग कोकुलवार कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, कोषाध्यक्ष शंकर गच्चे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, सचिव चंद्रकांत कदम, मुख्य संयोजक दत्ताहरी कदम, महिला विभाग संघटक रुपाली वागरे वैद्य आदींची उपस्थिती होती.

येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळ व भोकर तालुक्यातील मातुळ येथील शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या संयुक्त विद्यमाने पाचव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य विचारांना समर्पित अशा या साहित्य संमेलनातील गझलसंध्या सत्राचे अध्यक्ष म्हणून गंगाखेड येथील ख्यातनाम गझलकार आत्माराम जाधव होते. हे धर्मग्रंथ मित्रा...बांधून ठेव सारे या आंधळ्या पिढ्यांना चल संविधान सांग... रक्तात भीम माझ्या हृदयामधे शिवाजी, याहून श्रेष्ठ कुठली मी खानदान सांगू? ही गझल सादर करून उपस्थितांच्या अंतःकरणात हात घातला. सुप्रसिद्ध गझलकार गजानन वाघमारे यांच्या अशा आशयघन शेरांनी सूत्रसंचालक चंद्रकांत कदम (सन्मित्र) यांनी गझलसंध्येची सुरेल सुरुवात केली. हो नव्याने गड नवा बांधायचा आहे मला...एक शिवबा हरघरी घडवायचा आहे मला या गझलेने वाहवा मिळवली. अशा दमदार शेरांची तरन्नुम गझल गात गझलकार यशवंत मस्के यांनी गझलसंध्येचा आगाज केला व रसिकांची भरभरुन दाद मिळवली.

तलवारीच्या पात्यावरचे जगणे असते,इतके सोपे कुठे शिवाजी बनणे असते? ताना येसा बाजी नेता आणि बहिर्जी...मैत्रीमध्ये प्राण फुंकतो असा शिवाजी अशा आशयघन शेरांनी गझलकारा रोहिणी पांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करत उपस्थितांना अंतर्मुख केले.सिंह शिवबा पूत्र छावा शूरतेची खाण आहे, दख्खनी मातीस इथल्या वीरता वरदान आहे...आज का नाही सुरक्षित आमची माता बहिणही? शिवप्रभुंचा मावळा झाला कसा गतप्राण आहे? अशा शेरांमधून आजच्या अस्वस्थ काळात शिवविचारांची असलेली नितांत गरज गझलकार विजय धोबेंनी स्पष्ट केली. शिवबासमान माझ्या आहे इथे कुणी का? दिसते हरेक महिला आई बहीण ज्याला...असे मार्मिक शेर सादर करुन गझलकार पत्रकार विजय वाठोरे यांनी रसिकांची दाद मिळवली. कशी कळावी तुला जिजाई? कुठे शिवाजी तुझ्यात आहे? अशा वैचारिक शेरांनी गझलकारा अंजली मुनेश्वर यांनी उपस्थितांची दाद मिळवली. नभी भगवा फडकतोया स्वराज्याचा

दऱ्याखोऱ्यात शिवबाचा ठसा आहे...अशा बहारदार गझलेने गझलकार सतीश देशमुख यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. आई तुझ्या मुलाला कोळून पाज शिवबा, त्याला दिसेल परक्या स्त्रीच्या रुपात आई...असे आशयघन सिग्नेचर शेर व गझलांनी प्रख्यात गझलकार आत्तम गेंदे यांनी रसिकांना खिळवून ठेवले.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...

## शेंदूर फसलेला प्रत्येक दगड देव नसतो

ज्योतिर्मय साहित्य

आपल्याला दिसलेल्या दगडाला शेंदूर फासून देव समजणाऱ्या आणि देवाच्या नावाखाली स्वतःचे खिसे भरणाऱ्या अशा अनेकांनी आपली नावं धनाढ्यांच्या यादीत नेहमीच वरच्या क्रमांकावर ठेवण्याचा जो चंग बांधलेला असतो, त्याची जाणीव आपल्यापैकी किती जणांना होत असते? माणसात देव न दिसणाऱ्या प्रत्येकालाच त्या दगडातला देव मात्र हमखास पावतो; का कसा कोणास ठाऊक? वयोवृद्धाला नतमस्तक होऊन त्यांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा घेण्यापेक्षा शेंदूर फासून एखाद्या झाडाखाली ठेवलेल्या दगडाच्या समोर मात्र जाता–येता डोकं आपटणारे संख्येनं कमी नाहीत. त्याच्या पुढ्यांत हजारो, लाखो रुपयाचं दान करणारे मात्र स्वतःच्या माता पितांच्या वृद्धार्पणात त्यांच्यासाठी शे–दोनशे देखील खर्च करू शकत नाहीत. त्यांच्या जाणीवा इतक्या संपलेल्या असतात कि जिथे दगडातल्या देवापेक्षा चालत्या–बोलत्या जन्मदात्या देवाचाच त्यांना विसर पडत असतो. दगडाला देव मानण्याच्या अंधश्रद्धेत अडकण्याच्या ऐवजी जन्मदात्यांमध्ये असलेलं देवत्व समजून घेऊन त्यांच्यावर श्रद्धा का ठेवू शकत नाहीत?

आपल्या प्रत्येकालाच घरातल्या देव्हाऱ्यातील देवाचं अस्तित्व, महत्व, महात्म्य अगदी लहानपणापासून माहिती असतं, कमी अधिक प्रमाणात ते कळलेलं असतं. त्यामुळे आपल्या मनातील देव म्हणजे आपलं देवघर आणि जो देवघरांत असतो, दिसतो तो म्हणजेच देव. अशी आपली मनोधारणा असते, त्याची आपण केलेली ती देवाची व्याख्या असते. आपण देव नाही असं मानण्याची गरज नाही. पण कोणत्या कारणामुळे, कोणत्यावेळी, कोणत्या ठिकाणी त्या देवाचं दर्शन होईल, हे मात्र कोणालाच माहिती नसतं, सांगता येत नसतं. आपण नेहमीच दृश्य गोष्टींवर भरवसा ठेवत असतो, अशी वस्तू दिसल्यानंतरच आपण ती आहे असं म्हणत असतो, त्याचं अस्तित्व मान्य करत असतो.

## कसं हुईल, काय हुईल...!


ज्योतिर्मय साहित्य






विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

त्यांच्या सूक्ष्म विनोदबुद्धीची दाद द्यावीशी वाटते. खेड्यापाड्यात आजही गेलं की बाहेरच्या भिंतीवर अनेक फोटो लावलेले असतात. त्या फोटोच्या खाली दररोज सकाळ संध्याकाळ उदबत्ती लावून त्या फोटोच्या काचा काळ्या झालेल्या असतात. त्यावर ते मार्मिक विनोद करतात. उदबत्ती लावू लावू फोटोच्या काचा इतक्या काळ्याभंगार पडेल हेत की कधी कधी त्या काचा त्या ग्रहण पाहायला कामात येतात. इंग्रजी आणि मराठीचं गमतीदार मिश्रण प्रेक्षकांना हसून हसून लोटपोट करतं. द होल वावर इज आवर या सारखी वाक्ये धमाल आहेत. जमिनीचा पोपडा नको काढू ना, हातवारे नको करू यासारखी वाक्ये खूप हसवतात. काशिनाथची आई म्हणजे बाप्पाची बायको. तिचं पण व्यक्तिमत्व त्यांनी छान उभं केलंय. तिला ते खटलं म्हणतात. आमचं खटलं महाचेंगट, बसली तर उठत नाही, उठली तर बसत नाही, येणार नाही ती बाई लवकर, आयुष्यभर जीव खाल्ला माझा कुरतडून... यासारखी वाक्ये तिची स्वभावैशिष्ट्ये आणि बाप्पाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन दाखवतात. तर ती सुद्धा फार मजेशीर बोलते. तुम्ही मला बोलवलं का ? फौजदारासारखं म्हटलं, फौजदार नाही... अशी तिची वाक्ये धमाल उडवतात.



सगळ्यात धमाल उडवतात ती बायकांची एकमेकांबद्दलची वाक्यं. नणंद कशी आहे ते फार छान सांगितलं आहे. बायकांना हळू आवाजात कुजबुजण्याची सवय असते. त्यातून अगदी हळू आवाजात, अजिबात काम करत नाही. ही बाई कशाचं श्रेय घेईल काही सांगता येत नाही. काही चांगलं झालं माझ्यामुळं झालं. काही झालं माझ्यामुळं झालं, काही झालं हिच्यामुळं झालं, हरभरी मेली. यासारखी वाक्ये प्रेक्षकांना प्रचंड हसवतात.

काशिनाथ जेव्हा आत्महत्या करण्याबद्दल बोलतो, तेव्हाचं बाप्पाचं बोलणं प्रेक्षकांना आतून हलवून टाकतं. जुन्या पिढीनं केलेला त्याग, त्याची जाणीव नव्या पिढीनं ठेवावी असंच जणू सांगून बाप्पा आपल्याला अंतर्मुख करतो. **(क्रमशः)**







उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सत्वगुण लक्षण


ज्योतिर्मय साहित्य

शरीर रोगाने पिडले आहे दारिद्रय ठाण मांडून बसले आहे, जो तहान भुकेने व्याकुळ झाला आहे अशा जराजर्जर अवस्थेत असलेला पण त्याची परमेश्वराची भक्ती व मनीचा निश्चय पक्का आहे . असा सत्वगुणी भक्त मिळाला तर अजून काय पाहिजे.

साधना घडून शुध्द आत्मज्ञान होणे हीच खरी सत्वगुणाची खरी करामत आहे. ज्ञानी पुरूष पूर्ण वासना रहीत,अभिमान रहित असतो. दयाळू,नरम, विशाल अंत:करणाचा असतो. दुसऱ्या चे दोष सोसुन पण त्यांना भक्ती मार्गाला लावतो.श्रवण मनन, निदिध्यास या साधन मार्गाने जाऊन ज्याला शुध्द ज्ञान आत्मसात होते साधना प्राप्त होते. वागण्या बोलण्यात लीनता येते नितीमर्यादा, ईतरांना संतोष देणे, स्वतःच्या कामापेक्षा ईतरांच्या कामाची ओढ असणे, दुसऱ्या चे गुणदोष दिसत असुनही सोईस्कर त्याकडे दुर्लक्ष करतो. कोणी टाकुन बोलला तर सहन करतो. ऊलट ऊत्तर देत नाही. रागावर नियंत्रण ठेवतो.दु:ख गिळणे, निंदकावर ऊपकार करणे, ईंद्रियदमन करणे,नामस्मरणावर विश्वास असणे,संतांना शरण जाणे, लोकांना शहाणे करणे, जर ऐखादा वाममार्गाला जात असेल तर त्याला सन्मार्गावर आणणे, जो कुणावरही अन्याय करत नाही तरीपण त्याला केवळ सूडबुद्धीने छळतात अनेक प्रकारचे दु:ख देतात. सत्वगुणी माणुस हे सगळं शांतपणे झेलतो दु:ख गिळतो. हा त्याचा सात्विक गुण दिसुन येतो. जो दुसऱ्या साठी देहाने झीज सोसतो, दुर्जनाशी पम आपले पणाने वागतो,निंदकावर ऊपकार कयतो. मन ऐकत नाही नको त्या गोष्टींच्या मागे धावते ते विकारी मन विवेकाने आवरतो. ईंद्रिय ताब्यात ठेवतो.सत्कर्म करावीत दुष्कर्मे सोडून द्यावीत. दोन गटात बेबनाव झाला तर तो सोडवतो. देवाधर्माच्या कार्यात ऊदा,तुळशीपत्रे, दुर्वा, लिंगार्चन, अभिषेक नामस्मरण, संतांची सेवा करतो लोकांना सन्मार्ग दाखवतो. स्वच्छता,,नामस्मरण, देवधर्म, कुठल्याही लोभाची अपेक्षा न करता ज्ञानमार्गाचा आत्मानात्मक विवेक ऊत्पन्न होऊन भगवत् भक्तीत परम पदाला पोहचलेला भक्त म्हणजे सत्वगुणी होय .

श्रीराम जय राम जय जय राम सत्वगुण नाम समाप्त.

जय जय रघूवीर समर्थ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाचे त्रिकालबाधित श्रेष्ठत्व

ज्योतिर्मय साहित्य

ाम हे सच्चिदानंद स्वरूप आहे. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी जवळ कुणी असेल तर ते फक्त नामच होय. नाम हे चिन्मय असल्यामुळे त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टी तयार होते.

अनेक रूपे घडविणे, ती मोडणे आणि नवीन तयार करणे, पण आपण स्वतः मात्र मूळ स्वरूपाने राहणे, ही केवढी विलक्षण लीला आहे खरोखर, तुम्हाला मी काय सांगू बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत मी नामाबद्दलच बोलत आहे, अजून नामाचे माहात्म्य संपत नाही. नामाचे माहात्म्य सांगून संपले तर भगवंताचे भगवंतपण लटके झाले असे समजावे. जो नामात मी पणाने नाहीसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरूष नामाविषयीं मौन तरी धरील, कारण त्याचे माहात्म्य कोणालाच सांगता येणार नाही; किंवा शेवटच्या श्वासापर्यंत नामाचे माहात्म्यच सांगत राहील, कारण ते कितीही सांगितले तरी संपणार नाही, आणि कितीही ऐकले तरी तृप्ती होणार नाही.

नामाने सर्व पापे नाहीशी होतात. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते.

नाम हे वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे, कसे ते पहा. वेदाध्ययनापासून फायदा होण्यासाठी चारी वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे. त्यासाठी पुष्कळ वेळ आणि श्रम लागतात. नामाला श्रम नाहीत. दुसरे, वेदांचा अधिकार सर्व लोकांना नाही, पण नाम कुणीही घ्यावे. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ॐकारानेच होतो, म्हणून वेदारंभी देखील नामच आहे.

नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्ये बदल होण्यासाठी यात्रा करायची असते; पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती, वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. पंढरपूरला जाऊन नाम घेण्याचे जर न शिकला तर जाणे व्यर्थ गेले म्हणावे.नाम घ्यावे अशी बुद्धी होण्यासाठीच तिथे जाणे जरूर आहे. नाम हे सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत, त्याच्याकडे नेणारे जे कर्म तेच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणाने भगवंताकडे नेतात, नाम हे साक्षात् भगवंताकडे पोहोचवते. नामाने भवरोग नाहीसा होतो. भव म्हणजे विषय. विषयांची आसक्ती असणे हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्याने भगवंताकडे प्रेम लागते आणि इतर ठिकाणची आसक्ती सुटते. नामाने सर्व दुःखे नाहीशी होतात, कारण या दुःखाचे मूळ विषयांच्या आसक्तीमध्ये आहे, आणि नामाने ती आपोआप सुटते, म्हणून दुःख नाहीसे होते. शिवाय, भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला नामाने घट्ट धरला की दुःख त्या ठिकाणी कसे राहू शकेल.

बोधवचन : प्रत्येक मनुष्याने भगवंताचे नाम घ्यावे, त्याचे ध्यान करावे,त्याच्या स्मरणात राहावे, आणि आपल्या जन्माचे सार्थक करून घ्यावे.

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## परिपूर्ण आनंद

ज्योतिर्मय साहित्य

काही मंडळींची तक्रार असते, मी इतके देवाचे करतो, जप, पूजा, अर्चना, मेडिटेशन, उपास सगळे अगदी हट्टाने, वेळच्या वेळी चालू असते. अगदी आजारी असेल किंवा प्रवासात असेल तरी सुद्धा वेळच्या वेळी सगळे चालू असते. पण पाहिजे तसा परिणाम दिसत नाही. अपेक्षे प्रमाणे आनंद मिळत नाही. या उलट काही माणसे काहीच करत नाहीत पण आनंदी दिसतात. त्यांना सगळे मिळते.

या सगळ्यांची कारणे भिन्न भिन्न आहेत. आपण त्या पैकी ध्यान या संबंधी असलेली कारणे बघू.

या साठी आपल्याला एक गोष्ट प्रामाणिकपणे करावी लागणार आहे. ती म्हणजे

स्वसंवाद आणि आत्मपरीक्षण

एका जागी शांत बसा. ज्या घटना आपल्याला त्रास देतात त्या डोळ्या समोर आणा.आता त्या मागील कारणे त्रयस्थपणे शोधा.हे सगळे स्वतःशी प्रामाणिक राहून करायचे आहे. कोणाला सांगायचे नाही.

जी व्यक्ती राग, रुसवा धरून बसते किंवा स्वतःची चुक लक्षात येऊनही मान्य करत नाही ती सहजा सहजी दुसऱ्यांना क्षमा करू शकत नाही.आणि स्वतःला पण माफ करू शकत नाही.

त्यामुळं सगळ्यात वाईट गोष्ट अशी होते की त्या माणसाची कुंडलिनी शक्ती ही मूलाधार चक्रातच अडकते....

मग तुम्ही कितीही उपासना करा, ध्यान करा, मंत्र जप करा........काय वाटेल ते करा, अजिबात उपयोग होत नाही कशाचाही...

दुसऱ्यांना माफ केल्यानं मूलाधार चक्र होतं,

अगदी आपोआपच होतं. त्या साठी फार मोठी साधना करावी लागत नाही.

मुलाधार चक्र झालं तरच त्यातून ऊर्जा होऊ शकते....

गाडी चालूच नाही झाली तर पुढं तरी कशी जाणार बरं ?

पुष्कळ लोक खूप उपास तपास करतात...

उपासना करतात, तीर्थयात्रा करतात..... पण...... पण एखाद्याला माफ करू शकत नाहीत. बरेचदा आपण वाक्ये ऐकतो, मी आता कायमचे लक्षात ठेवेन, बघून घेईन, सोडणार नाही, आयुष्यभर बोलणार नाही.

त्यामुळं कितीही, काहीही केलं तरी कुंडलिनी शक्तीची गाडी काही हलतच नाही. आणि मग ओरडायला मोकळे होतो. इतकं देवाचं केलं पण काहीच उपयोग होत नाही...

कसा होणार ? शत्रू मध्ये ही तोच लपलेला आहे...

तो कोण? तर ईश्वर......

ओशो म्हणायचे की....

राम मे राम देखा तो क्या देखा ? रावण मे भी राम देखो, तो जाने.....

अध्यात्मात मिळवणं सोपं असतं, पण मिळालेलं टिकवणं अतिशय अवघड असतं....

मुळात ते कुठं वाया जात नाहीय ना ? आपलं काही चुकत आहे का ? या कडे लक्ष द्यावे लागते.आणि आपल्याला आयुष्यात नेमके काय हवे आहे ते लक्षात घ्यावे लागते.

त्या साठी पुढील काही गोष्टी आवर्जून कराव्या लागतील

- विसरणे आणि क्षमा करणे*
- जगात प्रत्येक व्यक्ती युनिक आहे.हे लक्षात ठेवणे.
- मी दैवी शक्तीचा अंश आहे.
- माझ्यात परिपूर्ण नैसर्गिक शक्ती आहेत.

हे संकल्प कायम घोकणे. या प्रत्येक संकल्पावर आपण चर्चा करू. जे आपल्याकडे नाही आहे त्यापेक्षा जे आपल्याला लाभले आहे त्याचाही असा आनंद उपभोगून आपले मुलाधार चक्र होऊ शकते.....आनंद रोमा रोमात मुरतो. आत्ता आज पासून एक गोष्ट करु या.

स्वसंवाद किंवा स्वपरीक्षण त्यातून पुढचा मार्ग दिसणार आहे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**सिंहः शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु।**
**प्रकृतिरियं सत्तवतां न खलु वयस्तेजसो हेतुः ।।**

अर्थ – सिंहाचा छावा देखील मदस्त्रावाने मलिन झालेल्या हत्तींवर आक्रमण करतो. तेजस्वी लोकांचा हा स्वभावच आहे. नक्कीच वय हे शौर्याचे कारण नसते.

शौर्य आणि वय यांचा संबंध नसतो. शौर्य म्हणजे केवळ शारीरिक युद्ध कौशल्य नव्हे. शौर्याचा संबंध जसा शारीरिक बलाशी आहे, तसाच तो मानसिक बलाशी देखील आहे. दौर्बल्यरहित मन असणा–या व्यक्तीचे ठिकाणी शौर्य निवास करीत असते. तेव्हा शौर्यासाठी वय नव्हे, तर मानसिक सुदृढता आवश्यक ठरते, असा भाव येथे व्यक्त करण्यात आला आहे.

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य

आठवणी या अशा का असतात,ओंजळ भरलेल्या पाण्या सारख्या, नकळत ओंझळ रीकामी होते, आणि मग उरतो फक्त ओलावा, प्रत्येक दिवसाच्या आठवणीचा. मनातले गैरसमज जाळून टाकले की, नात्यातील तणावाची राख होते. स्वभाव असा असावा की, सहवासाची जाणीव नाही झाली, तरी पण दुराव्यात उणीव भासली पाहिजे. आपल्या आयुष्याचा प्रवास सहज, आणि सोपा करण्यासाठी, आपल्या अपेक्षांचे ओझे कमी करा. जसे विनाकारण काळजी करणे म्हणजे आपण कधीही न घेतलेल्या कर्जावर व्याज भारण्यासारख आहे आयुष्यात नेहमी आनंदात जगायच कारण ते किती बाकी आहे हे कोणालाच माहिती नसतं यासाठी जीवनाच्या प्रत्येक पावलावर आपल्या हातून मानवोपयोगीकाम व्हावे , हाच मानवी जीवनाच्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याचा मार्ग आहे.

पावसाचे थेंब भलेही छोटे असोत, परंतु त्यांचं निरंतर बरसणे, मोठ मोठ्या नद्यांना पुर आणते, अशाच प्रकारे आपले छोटे–छोटे परंतू निरंतर प्रयत्न पण, जीवनात मोठे परिवर्तन आणू शकतात. जसं प्रत्येक माणूस नेहमी चांगल्या वेळेची आतुरतेने वाट पाहत असतो. पण चांगल्या वेळेपेक्षा चांगली माणस महत्वाची असतात. कारण चांगल्या माणसांच्या संगतीमुळे चांगली वेळ नक्कीच येऊ शकते. म्हणूनच जितके मोठे मन तितके सोपे जीवन वादाने अधोगती, संवादाने प्रगती जग काय म्हणेल हा विचार करू नका कारण लोक फार विचित्र आहेत, अपयशी लोकांची थट्टा करतात आणि यशस्वी लोकांवर असुया (जळतात) करतात.





## संधीवात रोग

ज्योतिर्मय साहित्य

१३) संधीवात रोगात बटाट्याचा रस पिण्याने आराम मिळतो. दररोज २०० मिलीलीटर रस प्यावे हा पण प्रयोग प्रभाव शाली आहे.

१५) अधिक पायर्या चढणे हानिकारक आहे.

१६) विश्रांती दरम्यान संतुलन राखणे महत्वाचे आहे.

१७) आल्याचा रस पिल्याने संधीवातात होणाऱ्या वेदना कमी होते.

१८) मिक्सरमध्ये जवस (अळशी) बिया घालून पावडर बनवा. आणि सकाळी २० ग्रॅम आणि संध्याकाळी २० ग्रॅम पाण्यात घ्या. यामध्ये ओमेगा फेटी अँसिड असते, जे या आजारात खूप फायदेशीर मानले गेले आहे. यामुळे बद्धकोष्ठता टाळण्यास देखील मदत होते. जवसाच्या सेवनाने अंगात कधी उष्णता होऊ शकते. जर असे झाल्यास प्रमाण कमी करावे आणि पाणी मात्र भरपूर प्यावे.

१९) चोपचीनी: कोकणात यास घोट वेल म्हणतात. जर ही मिळत असेल तर तिचा काढा करून प्यावा याने युरीक अँसीड कमी होईल.





२०) शिवाय निलगिरी तेल, दालचीनी तेल, राई तेल, कापूर आणि लवंग तेल ही बाजारातून आणून सम प्रमाणात मिक्स करून याने घुडगे किंवा दुखंणाऱ्या भागावर नित्य मालिश करून त्या भागावर सोसवेल इतक्या गरम पाण्याची धार धरावी. याने घामावाटे युरीक अँसीड तसेच त्या भागातील विष द्रव्ये निघून जातील.

अशा आजारासाठी असे काही उपाय आपण घरच्या घरी करुन गुण तर येईलच. पण कोणत्याही गोष्टीत जर श्रध्दा ठेवली आणि श्रध्दा पूर्वक केली तर तर त्याचा परिणाम पण चांगलाच येतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

झाले ! त्यांचे दर्शन झाले ! माझ्या गळ्यात असणारी लाल कंठी मी त्यांच्याकडे फेकली. त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले नाही. पण जाऊ दे. त्यांचे लक्ष त्या कंठीकडेही गेले नाही. हरकत नाही. ती त्या मिरवणुकीच्या गडबडीत पायाखाली तुडवली गेली. हे कळले मला. पण ती माती बघ. त्या कंठीमुळे लाल लाल झाली. ती कोणी दिली आहे हे कोणाला सुद्धा कळले नाही. पण ही गोष्ट महत्त्वाची नाहीच. त्यांचे दर्शन घेत असताना मला माझ्याकडील चे सर्वोत्तम आहे ते देता आले याचा आनंद आहे.

किती सुंदर समर्पणाची भावना आहे या कवितेत ! या कवितेतील राजकुमार म्हणजे परमेश्वराचे प्रतीक आहे. रवींद्रनाथांचे आयुष्य म्हणजे जणू ही कविताच असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ते स्वतः ही कविता जगले. आपल्याजवळील जे जे उत्तम, ते ते त्यांनी परमेश्वराला अर्पण केले. जीवनावर असे रसरसून प्रेम करणारी माणसे विरळी ! जीवनाप्रती असे प्रेम आणि संपूर्ण समर्पण असल्याशिवाय जीवन जगण्याची कला साधत नाही. असे जगता येणे ही सुद्धा एक कला आहे. या परमेश्वराने आयोजित केलेल्या विश्वरूपी उत्सवात आपल्या कलेचे दर्शन घडवण्याचा ध्यास हवा असे त्यांचे म्हणणे होते.

रवींद्रनाथांच्या इंग्रजीतील गीतांजली चा पहिला मराठी अनुवाद प्रसिद्ध कादंबरीकार हरि नारायण आपटे यांनी १९१७ मध्ये केला. त्याचप्रमाणे बंगालीतील ''अभंग गीतांजली'' वामन मंगेश दुभाषी यांनी मराठीत आणली. यानंतर त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर, काका कालेलकर आणि राम म्हैसाळकर यांनीही गीतांजलीचे गद्य अनुवाद प्रकाशित केले आहेत. गोविंद वासुदेव कानिटकर यांनी देखील इंग्रजीत अनुवाद केला आहे. प्रा. नरेंद्र जाधव यांनी देखील टागोरांच्या कवितांचा सुरेख अनुवाद केला आहे. खरंतर बंगाली भाषेतील लय आणि शब्द यांची जादू अनुवादात पकडणे अवघड आहे पण तरीसुद्धा अशा अनुवादातून त्यातील उदात्त असा आशय आपल्यापर्यंत सहजपणे पोहोचतो.

जे साहित्य जीवनावर प्रेम करायला शिकवते आणि माणूसधर्म शिकवते तेच खरे शिक्षण असे त्यांना वाटत होते. परंतु अशा शिक्षणाचा अभाव असल्यामुळेच आपल्या देशाची प्रगती होऊ शकली नाही याची खंत त्यांना होती. त्यासाठीच तर त्यांनी शांतीनिकेतनची स्थापना केली होती.

जीवनात कितीही अडचणी, अडथळे आले तरी खचून जाऊ नये, निराश होऊ नये अशी आपली वृत्ती असावी. त्याप्रमाणेच ते आयुष्यभर वागले. आपल्या ध्येयाशी ते ठाम राहिले. विचलित झाले नाहीत.त्यांची एक कविता अतिशय सुंदर आणि प्रेरणा देणारी आहे.

जदी तोर डाक शुने केउ ना आशे,
तबे एकला चलो रे
एकला चालो, एकला चालो, एकला चालो रे
म्हणजेच...
तुझी हाक ऐकून कोणी आले नाही तर तू एकटाच चालू लाग.
अरे, एकटाच चालू लाग.
तुझ्याशी कोणी शब्दसुद्धा बोलले नाही, तर तू एकटाच चालू लाग.
सारे जण भय वाटून, तोंड फिरवून बसले, तर काळीज उघडून मनातील गोष्टी स्वतःचीच मोकळेपणाने बोल !

# चित्ती असू द्यावे समाधान !



ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

दुसऱ्या दिवसापासून तो नोकरी मिळविण्यासाठी जोमाने कामाला लागला. कँपसची संधी हुकल्याने चंदनने नोकरी डॉट कॉमवर बायोडाटा टाकलेला होताच. योगायोगाने त्याला एका नावाजलेल्या बहुराष्ट्रीय कंपनीत मेकॅनिकल इंजिनिअर पदाचा कॉल आला. मुलाखतीचे शेड्यूल ठरले. चंदनने दोन राऊंड पास केले. तिसरा आणि शेवटचा राऊंड महत्वाचा होता. चंदनने भरपूर तयारी केली होती. अभ्यासही झालेला होता. ठरल्यावेळी मुलाखत देताना त्याने आपला आवडता देव गणपतीचे मनोभावे स्मरण केले. मनातला न्यूनगंड दूर केला. आत्मविश्वासाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. प्रयत्न, अभ्यास, आत्मविश्वास, इच्छाशक्तीच्या बळावर चंदनची निवड झाली. अर्थात या सगळ्यांसोबत गणपतीबाप्पाचाही आशिर्वाद मोलाचा ठरला. नोकरीचे लोकेशन मात्र मुंबई होते. पॅकेज आठ लाखांचे मिळाले. चंदनने ताबडतोब आपला जीवलग मित्र तारकेशला ही बातमी सांगितली. आपल्यापेक्षा चंदनला जास्त पॅकेजची नोकरी मिळाली हे ऐकून तारकेशला वैशम्य न वाटता त्याला आनंद झाला. त्याने मनापासून चंदनचे अभिनंदन केले. आठ दिवसांनंतर चंदन मुंबईला नोकरी जॉईन करायला गेला. सुरुवातीला त्याला मुंबईत गोंधळलेल्या सारखे झाले. नोकरीचे ठिकाण गाठण्यासाठी भल्या पहाटे उठून तयार व्हायचे. घाई गडबडीत नाश्ता करायचा. लोकल पकडायची. वेळेत कामावर हजर व्हायचे. संध्याकाळी काम आटोपले की पुन्हा लोकल पकडायची. घरी यायचे. दोन घास पोटात ढकलायचे आणि झोपेच्या अधीन व्हायचे. या सगळ्या गोष्टींची सवय नसल्याने काही दिवस त्याची चांगलीच दमछाक झाली. हळूहळू एकेक गोष्टींची सवय होत गेली आणि चंदन मुंबईत एकदाचा रुळला. दरम्यान तारकेश खास पुण्याहून चंदनला आपल्या मित्राला भेटायला मुंबईत शनिवार - रविवार दोन दिवस येऊन गेला. सुटीचे दिवस असल्याने दोघांनी भरपूर मजा केली. जुहू चौपाटी, गेट वे ऑफ इंडिया, सी लिंक रोड, मरीन ड्राईव्ह आदि ठिकाणी मनसोक्त भटकंती केली. मॉलमध्ये खरेदी केली. सिनेमा पाहिला. थोडक्यात जीवाची मुंबई केली. दोन दिवसानंतर तारकेश पुण्याला आणि चंदन मुंबईत. दोघांनी आपल्या कामाला जुंपून घेतले. शिक्षण झाले. नोकरीही लागली आता वेध लागले ते लग्नाचे. दोघांनाही बऱ्यापैकी वेतनाची नोकरी असल्याने मुलगी मिळायला काही अडचण नव्हती. इथे मात्र तारकेशने पुन्हा एकदा बाजी मारली. खरे पाहिले तर दोघांनाही उत्तम नोकरी. घरची परिस्थिती चांगली पण....पण इथे तारकेशचे व्यक्तीमत्व प्रभावी आणि बोलका स्वभाव शिवाय देखणेपण भारी ठरले आणि चंदनच्या आधी तारकेशचे दोनाचे चार हात झाले. सुस्वरूप आणि नोकरी करणारी मुलगी त्याला मिळाली. धुमधडाक्यात लग्न समारंभ पार पडला. इकडे चंदनाच्याही मनात लग्नासंबंधी विचाराने उचल खाल्ली. परंतु फोडांमुळे ओबडधोबड झालेला चेहरा, सावळा रंग आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा अभाव चंदनच्या लग्नात अडथळा ठरु लागल्या. चांगल्या घरातील उच्च शिक्षित मुलींची स्थळे चालुन यायची. प्रत्यक्ष भेट आणि चहा - पोहे झाले की नकारघंटा ऐकू यायची. मुलींच्या आई वडीलांचे वाक्य ठरलेले असायचे. आमचे काही म्हणणे नाही. मुलीला मुलगा पसंत पडला की झाले. खरे पाहिले तर चंदनला पाहिल्यावर त्यांचेही मत अनुकूल नसायचे. मुलीला पुढे करुन नकार देऊन ते मोकळे व्हायचे . चंदनला मात्र ही गोष्ट लक्षात येत नव्हती. त्याला वाटायचे आपल्या बरोबरीचा मित्र तारकेश याला चांगली देखणी आणि नोकरी करणारी मुलगी मिळाली मग आपल्याला का नाही तशी मिळत ? या विचाराने तो त्रस्त झाला. खरे पाहिले तर लग्न जुळवताना मुलीचे सौंदर्य आणि मुलांचे कर्तृत्व पाहिले जाते. चंदनच्या बाबतीत कर्तृत्वाबद्दल शंका घ्यायला जागा नव्हती. त्याचा चेहरा आणि रंग आड येत होता. चंदनला मात्र या बाबी मान्य नव्हत्या. त्यांचे एकंदर व्यक्तीमत्व पहाता एखाद्या सर्व साधारण मुलीशी त्याचे लग्न होऊ शकले असते पण चंदनच्या अपेक्षा अवाजवी होत्या. आपला मित्र तारकेशला जशी मिळाली तशीच आपल्यालाही बायको मिळायला हवी असा त्याचा अट्टाहास होता. या अट्टाहासामुळे त्याचे लग्न लांबत चालले होते. आपल्यात असा काय बदल व्हायला हवा की मुली आपल्याला पाहताक्षणी होकार देऊन लग्नास एका पायावर तयार होतील या विचारांच्या तंद्रीत तो सदैव असायचा. नेहमीप्रमाणे लोकलमधून प्रवास करत असताना समोरच्या बाकावर त्याला त्याच्याच वयाचा एक मुलगा बसलेला दिसला. गोरापान चेहरा, टोकदार नाक, बोलके डोळे आणि चेहऱ्यावर उत्सुकतेचे भाव असलेल्या त्या तरुणाने चंदनाचे लक्ष वेधून घेतले. त्याला पाहून चंदनच्या मनात विचार चक्र सुरु झाले. त्या विचारांच्या तंद्रितच तो घरी पोहोचला. जेवण करुन बेडवर पडला तरी त्यांच्या नजरेसमोरुन लोकलमधील त्या तरुणाचा चेहरा हटत नव्हता. आपणाला जर त्या तरुणासारखे व्यक्तीमत्व लाभले तर लग्नाची समस्या चुटकीसारखी दूर होऊन आपल्याला पाहिजे तशी मुलगी मिळेल याची चंदनला खात्री वाटायला लागली. त्यासाठी काय करावे लागेल या विचारात असताना त्याला आपल्या मित्रांची तारकेशची प्रकर्षाने आठवण आली. प्रयत्न, मेहनत केली आणि इच्छाशक्ती जागृत केली आणि आवडत्या देवाचे नामस्मरण केले की यश मिळते ! हा त्यांचा सल्ला आठवला. नोकरी मिळवण्यासाठी त्याने तो प्रयोग केला होता. त्यात यश मिळाले होते. चांगली नोकरी हाताशी आली. आता छोकरी मिळवण्यासाठी पुन्हा एकदा तो प्रयोग करायला काय हरकत आहे. ठरले तर मग. चंदन कडे नोकरी होती, बऱ्यापैकी कमाई चालू होती, मुंबई सारख्या महानगरात वास्तव्य होते आता फक्त कमी होती ती बायकोची. आणि ती मिळवण्यासाठी गरज होती चांगल्या व्यक्तीमत्वाची. ते प्राप्त करण्यासाठी लोकलमधल्या त्या देखण्या मुलासारखा चेहरा आपल्याला मिळावा म्हणून चंदनने आपल्या आवडत्या देवाकडे मागणी केली. नोकरीच्या वेळी देवाने जशी साथ दिली तशीच साथ आताही मिळेल ही खात्री मनात ठेऊन चंदन झोपी गेला. रात्रभर त्याला छान छान स्वप्न पडत होती. सकाळी मोठ्या समाधानाने आणि आनंदाने तो झोपेतून जागा झाला. सर्वप्रथम त्याने आरशात डोकावून पाहिले. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याच्या चेहऱ्यावरील फोड गायब झाले होते. रंगही उजळला होता. आपण अजूनही झोपेतच तर नाही ना ?, स्वप्न तर पडले नाही ना ? असे वाटल्याने त्याने घड्याळात पाहिले. पण तसे काही नव्हते. चंदन दररोजच्या सवयीनुसार सकाळी साडेसहाला उठला होता. आपल्या बदललेल्या रुपाची खात्री करुन घेण्यासाठी चंदनने पुन्हा एकदा आरशात आपली छबी न्याहाळली. आता मात्र त्याची खात्री झाली. आपले बदललेले रुप पाहून आनंदाने उजव्या हाताची मुठ वळवून '' येस आय गॉट इट '' असा उद्गार त्याने काढला खरा परंतु ते वाक्य त्यांच्या तोंडून काही बाहेर पडेना. चंदननें पुन्हा ''येस आय गॉट इट'' चार उच्चार केला मात्र त्यांच्या तोंडून नुसतीच हवा बाहेर पडली. झाल्या प्रकाराने चंदन हैराण झाला. रुम वर एकटाच रहात असल्याने चहा, नाश्ता करण्यासाठी तो नेहमीच्या हॉटेलवर गेला. तिथेही तोच अनुभव. चंदनाच्या तोंडून शब्दच बाहेर पडत नव्हते. आता मात्र चंदना काळजी वाटायला लागली. डॉक्टरांकडे जाण्याशिवाय पर्याय नव्हता. ऑफिसला सुट्टी मिळण्याबाबत मेल टाकून नाक, कान घसा स्पेशालिस्ट डॉक्टरांचा त्याने नेटवर पत्ता शोधला. ऑनलाईन अपॉइंटमेंट घेऊन दुपारी बाराच्या दरम्यान तो चर्चगेट जवळील डॉक्टरांच्या क्लिनिक मध्ये पोहोचला. तिथे त्याला आणखी एक धक्का बसला. डॉक्टरांकडे आलेल्या पेशंटच्या लाईनीत चंदनला तो दिसला. तो तोच होता. चंदनने लोकलच्या डब्यात ज्या देखण्या व्यक्तीमत्वाच्या मुलांकडे पाहून आपणासही तसे रुप मिळावे म्हणून देवाकडे प्रार्थना केली होती. तो मुका होता. चंदनच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आपण मागितले काय आणि मिळाले काय. ''ठेवीले अनंते तैसेच रहावे, चित्ती असू द्यावे समाधान'' म्हणतात ते खोटे नाही. आपल्यापाशी काय नाही यापेक्षा आपल्याकडे काय आहे हे डोळसपणे जाणून घेतले तर खऱ्या अर्थाने जीवनातला आनंद उपभोगता येतो हे नक्की.



विजय न्यायाधीश
(पुणे )

***

## दवा-खाना

# 'अति तेथे माती'




ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो!

पेनिसिलीनचे आगमन झाल्यावर २५ वर्षांनी त्याचा धो धो वाहणारा प्रवाह असूनही त्या पामराला कोणी विचारेनासे झाले. या पहिल्यावहिल्या प्रभावी प्रतिजैविकाची अशी शोकांतिका कां झाली असेल? याविषयी १९५० च्या सुमारासच फ्लेमिंग यांनी भीतीयुक्त भविष्यवाणी केली होती, पेनिसिलीनचा अनिर्बंध वापर केल्याने त्याची जिवाणूंविरूद्धची शक्ती कमी होत जाईल. त्याला जबाबदार तोच असेल जो याचा अकारण अतिरेकी वापर करीत आहे.

मंडळी, मागील कांही भागात आपण १९५० च्या आसपास शोधल्या गेलेल्या कांही प्रतिजैविकांविषयी जाणून घेतले. संबंधित वैज्ञानिकांना त्याबाबत नोबेल पुरस्कार देखील मिळाले. स्ट्रेप्टोमायसिन अशा जिवाणूंवर प्रभावी होते ज्यावर पेनिसिलीन उपयोगी पडत नव्हते. मग काय 'स्ट्रेप्टो-पेन' या जोडगोळीच्या इंजेक्शनचा मारा करण्यात बरीच वर्षे गेलीत. परिणाम काय तर स्ट्रेप्टोमायसिन क्षयरोगावर प्रभाव टाकेनासे झाले. त्यातच अजून कांही प्रतिजैविके मैदानात उतरली. पेनिसिलीन आणि त्याच्या रचनेपासून स्फूर्ती घेत १९५०-५५ च्या दशकात प्रयोगशाळेत विविध प्रतिजैविके तयार करण्यात आली. अँपिसिलीन आणि अमोक्सिसिलीन हे पेनिसिलिनचे अनुगामी अनुचर तोंडावाटे घेणे शक्य होते. टेट्रासायकलिन्स आणि क्लोरॅमफेनिकॉल ही नवी कोरी औषधे डॉक्टर आणि रुग्णांना भुरळ घालत होती. कारण अतिशय महत्वाचे, ही दोन्ही औषधे तोंडी घेता येत होती आणि बऱ्याच जिवाणूंवर प्रभावी होती, याशिवाय तोवर सल्फोनामाईडचा प्रभाव कमी झालेला होता.

असे म्हणतात की प्रेमाचा अतिरेक झाला की त्याचे नावीन्य कमी होते. इथेही तसेच झाले. जिवाणूंचा मेंदू (!) मानवापेक्षा अधिक सक्षम आहे, हे या चिमुकल्या जीवांनी वारंवार सिद्ध केले आहे. एक उदाहरण देते. पेनिसिलीन हे बाजारात आले तेव्हा स्टॅफिलोकॉकी वर १००% प्रभावी होते. मग १९५५ च्या सुमारास ते प्रभावहीन कां झाले? इथेच जिवाणूंच्या अस्तित्वासाठी कांहीही या मूलमंत्राचा आपल्याला परिचय झाला. पेनिसिलीन जवळ आले की त्यावर स्वनिर्मित द्रव्याचा (एन्झाईम) मारा करीत हे स्टॅफिलोकॉकी त्याचं असं कांही कंबरडं मोडीत की ते अकार्यक्षम होऊन जाई. हे नच जमले तर जिवाणूंवर पेनिसिलिनच्या कारवाईच्या ठिकाणाची अशी कांही गंमत (म्युटेशन) करीत, की पेनिसिलीनला ते ठिकाण ओळखूच येत नसे. मग जिवाणू तो मी नव्हेच असे नाटक वठवीत. स्ट्रेप्टोमायसिनकरता तर कांही जिवाणू (इ. कोलाय) वेगळाच खेळ करीत. ते जवळ आले की त्याला नो एंट्री ची पाटी दिसे. यदाकदाचित आत घुसलेच तर या जिवाणूंचे पहारेकरी स्ट्रॅप्टोमायसिन नामक गनिमाला चक्क आपल्या पेशीतून हाकलून देत. हे स्ट्रेप्टोमायसिन शेवटी प्रभाव ना टाकता आपली शेपूट गुंडाळून जसेच्या तसे रोग्याच्या मूत्रावाटे विसर्जित होत असे. तीच कहाणी इतर प्रतिजैविकांची! मंडळी, जिवाणूंनी निम्नलिखित सुभाषित चांगलेच आत्मसात केले असावे असे वाटते. मात्र प्रतिजैविकांचा अक्षरशः टनांनी वापर करणाऱ्या मानवाला याचे गमक कळले नाही.

अतिपरिचयादवज्ञा
सन्ततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरन्ध्री
चन्दनतरुकाष्ठमिन्धनं कुरुते ।।

(अर्थात, अति परिचयाने उपेक्षा वाट्याला येते आणि कुणाकडे वारंवार गेल्याने आपला अनादर होतो. हेच बघा ना, मलय पर्वतावर राहणारी भिल्लीण चंदनाच्या लाकडाचा चक्क इंधन म्हणून वापर करते!) या लढाईत वर्चस्व राहिले आहे जिवाणूंचे. कारण त्यांची विजिगिषु वृत्ती. 'जीवन त्यांना कळले हो', हेच खरे! या परिस्थितीला जबाबदार आपणच. म्हणूनच कदाचित काव्यात्मक न्याय म्हणून मागील भागात वर्णन केलेल्या नोबेल पुरस्कारांनंतर नवनवीन पर्यायी प्रतिजैविकांचा शोध लागूनही एकाही वैज्ञानिकाला नोबेल पुरस्कार मिळण्याचे सौभाग्य लाभले नाही. प्रिय मैत्रांनो, एका सरकारी सर्वेक्षणानुसार, भारतातील ३८ % पेक्षा जास्त रुग्णांना रुग्णालयात प्रतिजैविके लिहून दिल्या जातात. अशा बाबतीत सरकारी आकडे बहुदा तोकडे असतात. आणखी एक तपशील बघितला तर प्रतिजैविके आपल्या देशात लिमलेटच्या गोळ्यांसारखे प्रचलित आहेत याची खात्री पटते. भारतात कोणत्याही आजारासाठी प्रतिजैविकांचा एकंदर प्रिस्क्रिप्शन दर प्रति १००० व्यक्तींमागे ४१२ असा आहे. अर्थात १० रोग्यांपैकी किमान ४ ते ५ रोग्यांना अँटिबायोटिक दिल्या जाते. याविषयी अधिक चर्चा पुढील भागात!



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

# ‘‘उंच माझी भरारी‘‘ मराठवाड्यातील पहिल्या महिला फार्मासिस्ट सन्मान सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद !

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** मराठवाड्यातील महिला फार्मासिस्ट भगिनींसाठी खास आयोजित ‘‘उंच माझी भरारी‘‘ या ऐतिहासिक सन्मान सोहळ्याला आज मोठा प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलच्या पुढाकाराने आणि स्थानिक फार्मासिस्ट संघटनांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**महिला सशक्तीकरणाचा नवा अध्याय :**

कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. उद्घाटन प्रसंगी सदस्य मनोहर कोरे यांनी महिलांच्या योगदानावर प्रकाश टाकला. अनंत बोरकर यांनी महिला दिनाचे महत्व विषद केले. प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित ॲडव्होकेट आशा शेरखाने-कटके (अध्यक्ष, बाल कल्याण समिती, छत्रपती संभाजीनगर) यांनी महिलांच्या हक्क आणि संधींवर महत्त्वपूर्ण विचार मांडले.

डॉ. अर्चना राठोड-पवार (प्रोफेसर आणि प्रमुख, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, छत्रपती संभाजीनगर) यांनी महिलांच्या आरोग्यासंबंधी माहिती दिली. तसेच, डॉ. मंजिरी घरत यांनी फार्मासिस्ट क्षेत्रातील महिलांच्या वाढत्या सहभागावर सखोल मार्गदर्शन केले.



**प्रेरणादायी संवाद व संधींची दालने उघडली :**

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय स्तरावर अनुभवी वसुंधरा जक्का यांनी महिला फार्मासिस्टसाठी नवीन संधी, कौशल्यविकास आणि करिअर वाढीबाबत सखोल चर्चा केली.

एमएसपीसी अध्यक्ष अतुल अहिरे, उपाध्यक्ष धनंजय जोशी, पी सी आय सदस्य विजय पाटील यांचे विशेष शुभेच्छा संदेश लाभले. ‘‘एक महिला फार्मासिस्ट शिकली, तर संपूर्ण समाज आरोग्याच्या दिशेने पुढे जातो !‘‘ कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मंजुषा झिंजुर्डे, शीतल पांडे, जयश्री बोरसे, संगीता सोनवणे आणि त्यांच्या टीमने मोठे योगदान दिले. मासिआ अध्यक्ष चेतन राऊत यांनी या कार्यक्रमासाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल विशेष आभार मानण्यात आले.

**महिला फार्मासिस्ट सक्षमीकरणाची चळवळ :** महाराष्ट्रात ४.२ लाखांहून अधिक फार्मासिस्ट कार्यरत आहेत, फार्मासिस्टसाठी वैद्यकीय ज्ञानासोबत फार्मसी मॅनेजमेंट, हॉस्पिटल मॅनेजमेंट, सॉफ्ट स्किल्स आणि तंत्रज्ञानातील कौशल्य आत्मसात करणारे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. कार्यक्रमाच्या शेवटी शीतल पांडे यांनी आभारप्रदर्शन केले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. उपस्थित महिला फार्मासिस्ट भगिनींना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देण्यात आल्या.

**आगामी तेजस्विनी उपक्रमांतर्गत नवीन संधी!**

‘‘उंच माझी भरारी‘‘ हा कार्यक्रम केवळ एक सन्मान सोहळा नसून, महिलांच्या सशक्तीकरणाची चळवळ आहे. पुढील काही महिन्यांत ‘‘तेजस्विनी‘‘ उपक्रमांतर्गत अजून महत्त्वाचे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद लोहाडे, नंदकिशोर काळे,वसंत भराड, संगीता सोनवणे, मंजुषा झिंजुर्डे, शीतल पांडे, जयश्री बोरसे, संगीता सोनवणे ,अश्विनी जाधव, सोनाली कदम, मनीषा कुलकर्णी,प्रतिक्षा गोसावी, यांच्यासह रईस शेख, विनोद ठोंबरे,शेखर कोल्हे , ज्ञानेश्वर वाघलव्हाळे यांनी परिश्रम घेतले.

# सहचऱ्याच्या भावनेला प्राधान्य देऊन नाती बळकट करा-शकुंतला काळे



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे –** बदलता काळ लक्षात घेता स्त्रीने स्वतः मध्ये बदल करणे गरजेचे आहे. दुसऱ्यासाठी जगत असताना आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, मुक्त मनाने जगावे, एकमेकांशी भांडत बसण्यापेक्षा सहचर्याच्या भावनेला प्राधान्य देऊन परस्परातील नाती बळकट करावी असे प्रतिपादन माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महिला दिनानिमित्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

शनिवार दि. ८ मार्च रोजी स्व.बाळासाहेब कुंजीर मैदान येथे सायंकाळी हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी व्यासपीठावर पिंपरी - चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषालीताई मरळ तसेच पी के इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. धनश्री सोनवणे, मा. नगरसेविका निर्मलाताई कुटे, उन्नति सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा, डॉ. कुंदाताई भिसे, प्रा. रेखा येळंमकर यांची उपस्थिती होती. तर पिंपरी चिंचवड भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, पी के इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथअप्पा काटे, उन्नती फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे आणि ज्येष्ठ नागरिक महासंघांचे सरचिटणीस ईश्वरलाल चौधरी यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती. विद्येची देवता सरस्वती, राजमाता जिजाऊ आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. निर्मला कासार, शोभा राजगुरू, कल्पना सुर्वे, अन्वी शिंदे यांनी ईशस्तवन आणि स्वागतगीत सादर केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून व्यासपिठावरील मान्यवरांना गुलाबपुष्प आणि संत ज्ञानेश्वर पुस्तिका देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शोभा राजगुरे यांनी केले. सुत्रसंचलन शकुंतला शिंदे यांनी केले तर आभार निर्मला कासार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऑल सिनियर सिटीझनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मानवतावादी विचारवंत वि. दा. सावरकर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

बंधू नारायणराव सावरकरांना अंदमानातून पाठवलेल्या दि,६/७/१९२० च्या पत्रावरून सावरकर हे अंदमानात जन्मठेप भोगत असतानाही सावरकर अखिल मानवजातीच्या समानतेवर आधारित राष्ट्राचे स्वप्न पहात होते. तेव्हा त्यांनी मांडलेले विचार व तो मजकूर पुढील प्रमाणे आहे. ज्यात सर्व मनुष्यजातीचा समावेश होईल आणि जेथील एकूण एक स्त्रिया व पुरूषांना ही धरती,हा सुर्य,ही भूमी आणि हा प्रकाश हीच खरी जंन्मभूमी आहे. आईवडीलांच्या पासून मिळणाऱ्या लाभासाठी प्रयत्न करणा-याचा आणि त्याचा उपभोग घेण्याचा समान अधिकार राहील असे संपूर्ण जगाचे एकराष्ट्र हे आमचे ध्येय आहे. आणि त्यावर आमचा विश्वास आहे.

हिंदुस्थानातील परकीयांच्या स्वामित्व्रिरूध्द बंड करून उठावेसे वाटते तितकेच मला जातिप्रथा अस्पृश्यता यांच्या विरूध्दही बंड करून उठावेसे वाटते. सावरकरांचे सामाजिक विचार समजून घ्यायचे असतील तर ‘‘संगीत उ:शाप हे त्यांचे नाटक पहायला हवे मित्रांनो, त्याचबरोबरीने अत्यंत वैचारिक भाषा वापरून लिहिलेला निबंध(जात्युच्छेदक निबंध), क्ष किरणे, विज्ञाननिष्ठ निबंध असे पराकोटीचे अभ्यास पूर्ण निबंध वाचायला हवे. त्याची सामुदायिक पारायणे आजच्या तरूण पिढीने करायला हवीत. ‘‘स्वातंत्र्य,समता,विश्वबंधूत्व‘‘ ही संकल्पना समाजाच्या प्रत्येक शेवटच्या माणसापर्यंत पोहचली पाहिजे. ही विश्वव्यापी संकल्पना महाराष्ट्रातील एका मुलाच्या मनात निर्माण होते.समाजसुधारणेचा वसा घेतला जातो तो वाढवला जातो. त्यासाठी सर्व घरदार घरातील थोरली भावजय,सुविद्य पत्नी ची सुध्दा साथ लाभते. आणि हो एक सांगायचं आहे की !

तेव्हा त्यांच्याकडे नव्हता बँक बँलन्स,ना भुखंड,ना नावावर साखरकारखाने ना शैक्षणिक संस्था ना अनुदान ? काही कार्य करायचं तर पैसा हा लागतोच ना, पैशा शिवाय काही होत नाही. सावरकरांना तर समाजासाठी कार्य करायचं होतं ? समाजासाठी काही तरी करायचं ठरवलं आहे. पण माझीच चूल कशी पेटेल ही विवंचना होती पण अशा ऊतुंग व्यक्तिमत्वाची माणसे आपल्या वैयक्तिक गरजांकडे बघत नव्हती,मी एक स्वातंत्र्याचा ध्यास घेतला आहे तर ते मिळवण्यासाठी पडेल ते कष्ट यातना सहन केल्याचं पाहिजेत.श्रम करण्याची ताकद परमेश्वर अशा महान नेत्यांना व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांना देत होता. सावरकर घरातील स्त्रिया आणि त्यांचं देशासाठी योगदान यावर सतत चर्चा झाली पाहिजे. हा विषय घराघरात पोहचला पाहिजे.

नवीन पिढीला स्वातंत्र्य कसे व कोणी मिळवले हे समजले पाहिजे त्यांचा ठसा उमटवला पाहिजे.भौतिक सुखाच्या आहारी चाललेल्या आजच्या पिढीचे पाय जमिनीवर ठेवण्यासाठी सावरकर व त्यांचे देशाप्रती योगदान समजले पाहिजे. आपणही तसे वागावे ही भावना तरूणांच्या मनामध्ये निर्माण झाली पाहिजे.यासर्व विषयाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.



उज्वला धर्माधिकारी, पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

सावरकर एक कल्याणकारी विचारवंत होते,त्यामुळे नुसते विचार मांडून थांबले नाहीत, २ मे १९३८ मध्ये पुण्यात तब्बल १००० लोक (सर्व जाती पंथाचे) घेऊन सहभोजन केले. या भोजनाचा दाता होता श्रीमंत भागोजीशेठ कीर.अशा अनेक विचारवंतांची व अंगी दात्रुत्व असणाऱ्या लोकांना एकत्र केले. मंदिर प्रवेश सर्व जातीच्या मुलांना शाळेत प्रवेश,सर्व समाजातील एकी साठी प्रयत्न म्हणजे सामुहिक तिळगूळ वाटप व दस-याचे सोने वाटप ही संकल्पना सावरकरांनी सुरू केली. मित्रांनो मी या निमित्ताने अजून एक सावरकरांची संकल्पना तुम्हाला या प्रसंगी सांगते ती म्हणजे, शुभप्रसंगी वाजवला जाणारा बँड त्याची तर सतत गरज असते ना ! समाजातील सर्व मुलांना घेऊन एक बँड पथक तयार केले. वाजंत्रीची साधने (ढोल, ताशे) घेण्यासाठी बँकेकडून कर्ज घेतले. तरूणांना हक्काचा रोजगार सुरू करण्यासाठी एक साधन तयार केले. समाज सुधारणेसाठी अशा लहानसहान गोष्टी लक्षात घेऊन केवढी मोठी चळवळ सुरू केली हे पाहून मी तर सतत नतमस्तक होते. त्यात हरिजन भजन मंडळ, सर्व जातीधर्माच्या महिलांची भाषणे, महिलांना त्यांच्या समस्या सांगण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ तयार करून दिले. सर्व जातीच्या लोकांना मंदीर प्रवेशासाठी गीत लिहिताना तर त्यांना अश्रू अनावर झाले. सावरकर हे स्वभावाने खूपच हळवे होते हे दिसून येते. जिथे स्वत:च्या चरितार्थ चालवताना,किंवा चरितार्थ साधन अल्प असतानाही कुठल्याही प्रकारची पैशाची कमाई नाही असे असतानाही १९२९ च्या डिसेंबर महिन्यात एका अस्पृश्य मुलीला दत्तक घेतले. ‘‘भेदाभेद भ्रम अमंगळ ‘‘हा संतांचा विचार प्रत्यक्ष अमलात आणून दाखवला.



सावरकर समजून घ्यायला व समजावून सांगायला हा जन्म अपूरा आहे. थोडक्यात मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न मात्र केला आहे. अशा या दैदीप्यमान योध्याला तेजस्वी सुर्यपुत्राला शतकोटी वंदन,शतकोटी वंदन

थोर महात्मे होऊन गेले.
चरित्र त्यांचे पहा जरा
आपण त्यांच्या समान व्हावे
हाच सापडे बोध खरा.




# चिकाच्या दूधाच्या वड्या व धम्माल गोष्टी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ही गोष्ट साधारणपणे सन १९७२ ते १९७३ सालातील आहे. तेव्हा आम्ही भाऊ, बहीणी आणि आईवडील असं आमचं कुटुंब ! तेव्हाच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील उदगीर या छोट्या शहरात राहात होतो. आमच घर म्हणजे तेव्हा, एक मोठा वाडाच होता. आम्ही एक मांजर पाळली होती. तिचं नाव आम्ही भोण्णा ठेवलं होतं. तेव्हा, मातीच्या चुली होत्या. चुली शेजारी भोण्णा बसत असे. पण, चुलीवर ठेवलेल्या दूधाला तोंड लावत नसे. लक्ष्मी लदाडे नावाच्या दूधवालीकडे आमचा दूधाचा वरवा लावलेला होता. त्यामुळे, तिच्याकडे म्हैस व्याली की, ती आमच्याकडे चिकाचे (खरवश्याचे) ताजे दूध आणून देत असे. मग, आमची आई त्या चिकाच्या दूधाच्या साखर घालून वड्या करीत असे. आम्ही मग त्या वड्या आनंदाने खात असू. असेच एकदा दूधवालीने चिकाचे भरपूर दूध आणून दिले होते.नेहमीप्रमाणे आईने त्या दूधाच्या वड्या केल्या. आम्ही त्या नेहमीप्रमाणे खाल्ल्या. दूस-या दिवशीही खाल्ल्या. तरीसुद्धा, भरपूर वड्या उरल्या. मग, आईने एका स्टीलच्या मोठ्या ताटात त्या वड्या घालून ओट्यावजा खिडकीत त्या वड्या ठेवून दिल्या. भोण्णा खिडकीतून घरात येत असे. खिडकीत आली असता तसं तिचं लक्ष त्या वड्याकडे गेलं. त्यातल्या काही वड्या तिनं खाल्ल्या. नंतर पोट भरल्यावर निवांत घरात झोपली. दूस-या दिवशीही तिनं काही वड्या खाल्ल्या. नंतर, तसंच निवांत झोपली. तिस-या दिवशी मात्र खूप गंमतच झाली. नित्याप्रमाणे भोण्णा आली. तिनं ताटाकडे पाहिलं. एक फेरी मारुन नाकाने वास घेतला आणि उडी मारुन निघून गेली. पून्हा दूस-या दिवशी भोण्णा आली. आणि ताटाकडे बघताच जोरात म्याँव म्याँव करु लागली. बहुदा, तिलाही त्या वड्या खाण्याचा कंटाळा आला असावा. म्हणून ती गुरगुरत, जोरात म्याँव म्याँव करु लागली. म्हणजे तिला सूचवायचं होतं. म्हणायचं होतं की, रोज रोज ह्याच वड्या काय म्हणून माझ्यासमोर आणून ठेवत आहात. हे तिचं वागणं पाहून आम्ही भावंडं आणि बहिणी जोरजोरात हसायला लागलो. असा गंमतीदार किस्सा तेव्हा घडला. भोण्णाचा असाच दूसरा गंमतीदार किस्सा ! नंतर दूस-या भागात वाचूया !



मधुकर निलेगावकर, पुणे




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559